औरंगाबाद यांची 'रेन मेकर', सूर्योदय, लातूर यांची 'उंच माझा झोका ग' या एकांकिका सादर करण्यात आल्या. त्यानंतर सांगली नाटय परिषदेचे 'ययाती देवयानी' हे संगीत नाटक सादर करण्यात आले.

नांदेड शाखेचे 'लास्ट बेंच', बहुजन रंगभूमी, नागपूर यांचे 'नग रं बाबा शाळा', भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल अहमदनगर यांचे 'मी एक बोनसाय' ही बालनाटये सादर करण्यात आली. त्यानंतर देवदत्त पाठक यांनी बालनाटय शिबीर घेतले. 'बालनाटय तेंव्हा आणि आत्ता' या बालनाटयवर आधारीत परिसंवादानंतर सुयश ठाणे यांनी 'उठी उठी गोपाळा' हा खास स्त्रीयांसाठी कार्यक्रम सादर केला. त्यानंतर डॉ. विश्वास मेहेंदळे यांनी सूत्रसंचालीत केलेला 'मराठी नाटक, आज, काल आणि उद्या' हा वादसंवादाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात स्मिता तळवलकर, योगेश सोमण, जयंत जातेगांवकर, उदय धुरत, विलास गुर्जर आणि रमेश भाटकर सहभागी झाले होते. रात्रौ ९.०० वा. 'साभिनय नाटयसंगीत' हा नांदेड शाखेचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

## खुले अधिवेशन आणि समारोप समारंभ

रसिकांची प्रचंड गर्दी, उत्साहाला आलेले उधाण, कलाकारांची लक्षणीय उपस्थिती, विविध कार्यक्रमांची रेलचेल अशा पार्श्वभूमीवर नाटय संमेलनाचा समारोप समारंभ सुरू झाला. संमेलनाच्या समारोपासाठी मान्यवर व्यासपीठावर आले तेव्हा या सर्व भावभावनांचे प्रतिबिंब समोरच्या रसिकवृंदात दिसत होते. समारोपासाठी उपस्थित असलेले मान्यवर मा.श्री. गोपीनाथ मुंडे, मा.ना. श्री. सुनिल तटकरे यांची भाषणे झाली. तत्पूर्वी प्रमुख कार्यवाह श्री. प्रदीप कबरे यांनी प्रास्ताविक सादर केले.

नाटय परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी यांनी बीड येथील रसिकांच्या प्रतिसादामुळे आणि कलाकारांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे नाटय संमेलन यशस्वी झाल्याचे सांगितले व सर्व मान्यवरांचे, कलाकारांचे व रसिकांचे आभार मानले. संमेलनाध्यक्ष श्री. रामदास कामत यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या संमेलनात प्रतिवर्षीप्रमाणे खुले अधिवेशन संपन्न झाले. प्रत्येक तालुका पातळीवर छोटया नाट्यगृहाची निर्मीती करण्यात यावी. तसेच मराठी रंगकर्मीसाठी महाराष्ट्र शासनाने लवकरात लवकर भूखंड उपलब्ध करून द्यावा. नाटयशास्त्राचे शिक्षण शालेय पातळीपासून सक्तीचे करावे व तसा अभ्यासक्रम तयार करण्यात यावा अशा ठरावासह दहा ठराव या अधिवेशनात मंजूर करण्यात आले.